सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 477 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 25 / 12 / 2025

# 1)जबरी चोरी :–

**मनाठा :–** दिनांक 23.12.2025 रोजी 19.20 वा. चे सुमारास, **मार्लेगाव ते नेवरी रोडवर ता.हदगाव येथे,** यातील अनोळखी चार आरोपीतांनी यातील फिर्यादी हा त्यांचे न्यायालयाचे कामकाज करुन हदगाव येथुन नेवरी येथे जात असताना यातील अज्ञात आरोपीतांनी त्यांना मारहान करुन त्यांच्या जवळील न्यायालयीन कागदपत्रे व मोबाईल,नगदी रक्कम असा एकुण 7,000 / –रू चा ऐवज जबरीने चोरून नेला. .वगैरे **फिर्यादी अनंतकुमार प्रभाकर नेवरकर ,रा.ता. हदगांव जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 229 / 2025 कलम 309(4),3(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / श्री चवळी, मो. नं.9850807211** हे करीत आहेत.

# 2)चोरी :–

**लोहा :–** दिनांक 24.12.2025 रोजी 14.00 वा. चे सुमारास,**एस. टी. बसस्थानक लोहा,येथे** यातील फिर्यादी हया गंगाखेड बसमध्ये चढत असतांना त्यांच्या पर्स मधील सोन्याचे दागिने व पैसे एकुन किंमती 1,18,000 / –रू चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी ज्योती किशोर मुंडे, वय 39 वर्षे, रा. लेक्चर कॉलनी गंगाखेड ता. गंगाखेड जि.परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं393 / 2025 कलम 303(2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि भोसले /, मो.नं. 9923588124** हे करीत आहेत.

# 3)जुगार :–

**1)बारड :–** दिनांक 24.12.2025 रोजी 17.00 वा.चे सुमारास, **नागेली तिरकसवाडी शिवार कॅनॉल च्या बाजुला अशोक नारायन शिंदे याच्या शेता लगत खदानीत मोकळया जागेत ता.मुदखेड येथे,** यातील आरोपी नामे 1.शाम रावसाहेब हाटकर वय 28 वर्षे, रा. देगाव चाळ नांदेड व इतर सहा इसम हे विना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवीत असतांना नगदी 8350 / –रु. व चार मोबाईल किंमती 35,000 / –रु.असा एकुन किंमती 43,350 / –रु.चा मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ / 678 राम विठ्ठल बोचरे, ने.पोस्टे बारड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरनं 140 / 2025 कलम 12(अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2328 कारंजकर मो.नं.9767452207** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :–** दिनांक 24.12.2025 रोजी 18.00 वा.चे सुमारास, **संजय बेल्ट हाऊस समोर सार्वजनिक रोडवर शिवशक्ती नगर बसस्टॅंड रोड नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.शेख बबलु शेख शबीर वय 35 वर्षे, रा. शिवशक्ती नगर बसस्टॅंड जवळ नांदेड 2.विशाल नागोराव समदुरे वय 25 वर्षे रा. सिध्दनाथपुरी चौफाळा नांदेड हे विना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण क्लोज नावाचा जुगार खेळत व खेळवीत असतांना नगदी 14,100 / –रु. व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ / 1073 विश्वनाथ देविदास पवार, ने.स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 513 / 2025 कलम 12(अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 2042 शेळके मो.नं.9075786011** हे करीत आहेत.

**3)भाग्यनगर :–** दिनांक 24.12.2025 रोजी 15.30 वा.चे सुमारास, संतोष किराणा दुकानाजवळ **सार्वजनिक रोडवर कल्याण नगर राज कॉर्नर नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.रोहीत राधाकिशन भातावाले वय 30 वर्षे, रा. राम नगर कौठा नांदेड व ईतर तीन इसम हे विना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा जुगार खेळत व खेळवीत असतांना नगदी 10,270 / –रु. व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ / 183 संजय लिंगुराम च्यापलवार, ने. स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 664 / 2025 कलम 12(अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 575 कांबळे मो.नं.9552303028** हे करीत आहेत.

# 4)गळफास घेवून शेतकरी आत्महत्या :—

**रामतिर्थ :—**दिनांक 21.12.2025 रोजी 11.35 वा. चे सुमारास **मौ.तळणी  मयताचे राहते घरी ता. बिलोली येथे,** यातील **मयत नामे विकास कोंडीबा कांबळे, वय 33 वर्षे, व्यवसाय शेती रा. तळणी ता. बिलोली जि. नांदेड,** यांनी सततच्या नापीकीस कंटाळुन निराश होवुन फॅनच्या लोखंडी कडीला साडीने गळफास घेवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार कोंडीबा विठ्ठल वय 54 वर्षे, रा. जिगळा हमु तळणी ता. बिलोली**, यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे रामतिर्थ** आ. मृ. **27**/2025 कलम 194 भारतीय नागरी सुरक्षा संहीता—2023 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/832 रामचंद्र काळे, मो.नं. 8830899396** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड